www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**MH SET 2013 PHILOSOPHY PAPER 3 FEBRUARY 17, 2013 QUESTION PAPER**

FEB – 12313/III

# Philosophy
## Paper III
# दर्शनशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains seventy five (75) multiple choice questions. Each question carries Two (2) marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पच्चत्तर** (75) बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन** (2) गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. According to Advaita Vedanta the following powers of *avidya* are responsible for the perception of the external world :
   - (A) *Tulavidya* and *Mulavidya*
   - (B) *Adhyasa* and Bhrama
   - (C) *Prakasa* and *Kriya*
   - (D) *Avarana* and *Viksepa*

2. "~p" is a.................... .
   - (A) Simple and truth-functional statement
   - (B) Simple statement
   - (C) Compound and truth-functional statement
   - (D) Compound and non-truth-functional statement

1. अद्वैतवेदांतानुसार अविद्येच्या खालील शक्ती बाह्य जगाचे प्रत्यक्षज्ञान होण्यासाठी जबाबदार असतात :
   - (A) तूलाविद्या आणि मूळाविद्या
   - (B) अध्यास आणि भ्रम
   - (C) प्रकाश आणि क्रिया
   - (D) आवरण आणि विक्षेप

2. "~p" हे आहे........................
   - (A) सरल आणि सत्यता-फलनात्मक विधान
   - (B) सरल विधान
   - (C) मिश्र आणि सत्यता-फलनात्मक विधान
   - (D) मिश्र आणि न-सत्यता-फलनात्मक विधान

3. Gandhi believes in only one religion, because :

   (A) According to him there is one God

   (B) Hinduism is great religion

   (C) Moral standards all over the world are same

   (D) Basically he believes in Islamic monotheism

4. The following Vedantin Acaryas insisted on literal meaning (*mykhyartha*) of *mahavakyas* as against derivative meaning (*laksyartha*) :

   (A) Samkara and Ramanuja

   (B) Samkara and Nimbarka

   (C) Samkara and Vallabha

   (D) Ramanuja and Vallabha

3. गांधीजी केवल एका धर्मात विश्वास ठेवतात, कारण :

   (A) त्यांच्या मते ईश्वर एक आहे

   (B) हिंदुवाद हा महान धर्म आहे

   (C) संपूर्ण जगात नैतिक मानके सारखीच आहेत

   (D) मुलत: त्यांचा इस्लामी एकेश्वरवादावर विश्वास होता

4. खालील वेदांती आचार्यांनी महावाक्यांचा लक्ष्यार्थ न करता त्यांच्या वाच्यार्थावर भर दिला आहे :

   (A) शंकर आणि रामानुज

   (B) शंकर आणि निम्बार्क

   (C) शंकर आणि वल्लभ

   (D) रामानुज आणि वल्लभ

www.prepp.in



5. Conjunction of threads is the following type of the cause of a cloth :

   (A) *Asamavayikarana*

   (B) *Nimittakarana*

   (C) *Sahakarikarana*

   (D) *Samavayikarana*

6. The following system has criticised the Nyaya doctrine of Samanya most vehemently :

   (A) Mimamsa

   (B) Jainism

   (C) Sankhya

   (D) Buddhism

5. तंतुसंयोग म्हणजे कापडाचे पुढील प्रकारचे कारण होय.

   (A) असमवायिकारण

   (B) निमित्तकारण

   (C) सहकारी कारण

   (D) समवायिकारण

6. पुढील दर्शनाने न्यायदर्शनाच्या सामान्यविषयक सिद्धान्तावर अत्यंत जोरकस टीका केलेली आहे :

   (A) मीमांसा

   (B) जैन

   (C) सांख्य

   (D) बैद्ध

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



7. Rawls' concept of justice is a version of :

(A) Utilitarian theory

(B) Capabilities theory

(C) Intuitionist theory

(D) Contract theory

8. The view that one general term can be applied to many things that share a common property that is objective :

(A) Realism

(B) Nominalism

(C) Conceptualism

(D) Formalism

9. The weakness of will is :

(A) Eudaimonia

(B) Akrasia

(C) Arête

(D) Thumos

7. रॉल्सची न्यायाची संकल्पना ही याचीच एक आवृत्ती आहे :

(A) उपयुक्ततावादी उपपत्ती

(B) क्षमतावादी उपपत्ती

(C) अंत:प्रज्ञावादी उपपत्ती

(D) कराराची उपपत्ती

8. सामान्यपद हे अशा अनेक वस्तूंना लागू होऊ शकते ज्यात एक वस्तुनिष्ठ समान गुणधर्म असतो ?

(A) वास्तववाद

(B) नामवाद

(C) संकल्पनावाद

(D) आकारवाद

9. संकल्पनाचे दौर्बल्य म्हणजे :

(A) युडॉयमोनिया

(B) अक्रेसिया

(C) अरिटे

(D) टूमॉस

www.prepp.in



10. Match the pairs :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | Samkara | (*i*) | *Suddhadvaita* |
| (2) | Ramanuja | (*ii*) | *Bhedabheda* |
| (3) | Vallabha | (*iii*) | *Kevaladvaita* |
| (4) | Nimbarka | (*iv*) | *Visistadvaita* |

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (B) | (*iii*) | (*ii*) | (*i*) | (*iv*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |

11. Who among the following are nominalists ?

(1) Hobbes

(2) Locke

(3) Ockham

(4) Abelard

(A) (1) and (2)

(B) (2) and (3)

(C) (3) and (4)

(D) (1) and (3)

10. जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | शंकराचार्य | (*i*) | शुद्धाद्वैत |
| (2) | रामानुजाचार्य | (*ii*) | भेदाभेद |
| (3) | वल्लभाचार्य | (*iii*) | केवलाद्वैत |
| (4) | निंबकाचार्य | (*iv*) | विशिष्टाद्वैत |

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (B) | (*iii*) | (*ii*) | (*i*) | (*iv*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |

11. खालीलपैकी कोण नामवादी आहेत ?

(1) हॉब्ज

(2) लॉक

(3) ओकम

(4) ऑबेलॉर्ड

(A) (1) आणि (2)

(B) (2) आणि (3)

(C) (3) आणि (4)

(D) (1) आणि (3)

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



12. Which is the best definition of "Summum bonum" ?

(A) a good

(B) the greatest good

(C) the good

(D) the highest good

13. State which of the following are argument & / argument forms ?

(1) p ⊃ q

~ q / ∴ ~ p

(2) A ∪ B

~ A / ∴ B

(A) both (1) and (2) are arguments

(B) both (1) and (2) are argument-forms

(C) (1) is argument and (2) is argument-form

(D) (1) is argument-form and (2) is argument

12. 'समम बोनम' याची सर्वोत्कृष्ट व्याख्या कोणती ?

(A) शुभ

(B) सर्वाधिक शुभ

(C) शुभवस्तू

(D) परमोच्च शुभ

13. पुढीलपैकी कोणते युक्तिवाद आणि / युक्तिवादाकार आहेत ते ओळखा :

(1) p ⊃ q

~ q / ∴ ~ p

(2) A ∪ B

~ A / ∴ B

(A) (1) आणि (2) दोनही युक्तिवाद आहेत

(B) (1) आणि (2) दोनही युक्तिवादाकार आहेत

(C) (1) युक्तिवाद आहे आणि (2) युक्तिवादाकार आहेत

(D) (1) युक्तिवादाकार आहे आणि (2) युक्तिवाद आहेत

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



14. For Locke, intuition and demonstration are degrees of :

(A) Faith

(B) Reality

(C) Knowledge

(D) Opinion

15. If one infers fire on the basis of clouds seen by mistake as smoke on the mountain, then one is committing the following *Hetvabhasa* :

(A) Asiddha

(B) Viruddha

(C) Anaikantika

(D) Badhita

14. लॉक यांच्या मते अंत:प्रज्ञा आणि सिद्धता या मिती आहेत :

(A) श्रद्धेच्या

(B) वास्तवाच्या

(C) ज्ञानाच्या

(D) मताच्या

15. एखाद्याने पर्वतावरील ढग चुकीने धुरासारखे दिसत्याने त्या आधारावर अग्नीचे अनुमान केले, तर खालील तर्कदोष करीत असतो–

(A) असिद्ध

(B) विरुद्ध

(C) अनैकान्तिक

(D) बाधित

www.prepp.in
prepp Your Personal Exams Guide



16. Husserl's phenomenology is an alternative to :
    (A) Subjectivism
    (B) transcendentalism
    (C) Idealism
    (D) Objectivism

17. The phrase 'a-man' is for Russell :
    (A) a clear description
    (B) an ambiguous description
    (C) a definite description
    (D) a consistent description

18. Which of the follwing statements is *incorrect* ?
    (A) Copula expresses a relation between two terms
    (B) Copula is a sign of agreement or disagreement between the subject and the predicate
    (C) Copula does not assert or deny the existence of the subject or the predicate
    (D) Copula is a third term which is a part of a proposition

16. हुसेर्लचे मानसघटनाशास्त्र हे याच्यासाठी पर्याय आहे :
    (A) व्यक्तिनिष्ठता
    (B) अतीतवाद
    (C) चिद्‌वाद
    (D) विषयवाद

17. रसेलच्या मते 'एक-पुरुष' ही पदावली आहे :
    (A) स्पष्ट वर्णन
    (B) संदिग्ध वर्णन
    (C) निश्चित वर्णन
    (D) सुसंगत वर्णन

18. पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?
    (A) संयोजक दोन पदांतील संबंध व्यक्त करतो
    (B) संयोजक म्हणजे उद्देशपद आणि विधेयपद यांच्यातील संबद्धता आणि असंबद्धता यांचे चिह्न असते
    (C) संयोजक उद्देशपद किंवा विधेयपदाचे अस्तित्व स्वीकारतही नाही किंवा नाकारितही नाही
    (D) संयोजक म्हणजे असे तिसरे पद जे विधानाचा एक भाग असते

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



19. From the Platonic perspective, wrong doing is :

(A) an unwilling act

(B) a voluntary act

(C) a cognitive act

(D) an ignorant act

20. When in illusion one cognises silver in place of a counch-shell, the status of silver according to Advaitavedanta is :

(A) Real

(B) Unreal

(C) Neither real nor unreal

(D) Identical with self

19. प्लेटॉनिक दृष्टिकोनानुसार गैरकृत्य ही :

(A) अनिच्छापूर्वक कृती आहे

(B) ऐच्छिक कृती आहे

(C) बोधात्मक कृती आहे

(D) अज्ञानमूलक कृती आहे

20. भ्रमाच्या वेळी जेव्हा एखाद्याला शुक्तीच्या जागी रजत भासते, तेव्हा अद्वैतवेदांतानुसार रजताचा दर्जा खालील प्रमाणे असतो :

(A) सत्

(B) असत्

(C) सत् ही नाही, असत् ही नाही

(D) आत्म्याशी एकरूप

www.prepp.in



21. The following classification of *anumana* is *not* accepted by Nyaya :
    (A) *Svabhavanumana and Karyanumana*
    (B) *Svarthanumana and Pararthanumana*
    (C) *Purvavat, Sesavat and Samanyatodrsta*
    (D) *Kevalanvayi, Kevalavyatireki, Anvayavyatireki*

22. The *four* Brahmavihara accepted in Buddhism are :
    (A) *Maitri, Satya, Brahmacarya, Karuna*
    (B) *Maitri, Sila, Samadhi, Karuna*
    (C) *Maitri, Karuna, Mudita, Upeksa*
    (D) *Sila, Samadhi, Prajña, Paramita*

21. न्यायदर्शनाने अनुमानाचे खालील वर्गीकरण स्वीकारलेले **नाही** :
    (A) स्वभावानुमान व कार्यानुमान
    (B) स्वार्थानुमान व परार्थानुमान
    (C) पूर्ववत्, शेषवत् व सामान्यतोदृष्ट
    (D) केवळान्वयि, केवलव्यतिरेकि, अन्वयव्यतिरेकि

22. बौद्धदर्शनाने स्वीकारलेले **चार** ब्रह्मविहार आहेत :
    (A) मैत्री, सत्य, ब्रह्मचर्य, करुणा
    (B) मैत्री, शील, समाधि, करुणा
    (C) मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा
    (D) शील, समाधि, प्रज्ञा, पारमिता

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



23. Out of Isvara, Jiva and Jagat, according to Madhva :

(A) Isvara is independent, others are dependent

(B) Isvara and jiva are independent, jagat is dependent

(C) All are independent

(D) All are dependent on Brahman

24. According to Gandhi, Truth should be in :

(A) Custom, Tradition and Law

(B) Tradition, Worship, Action

(C) Prayer, Worship and Devotion

(D) Thought, Speech and Action

23. ईश्वर, जीव आणि जगत् यांपैकी मध्वाचार्यांच्या मते :

(A) ईश्वर स्वतंत्र आहे, बाकीचे परतंत्र आहेत

(B) ईश्वर आणि जीव स्वतंत्र आहेत, जगत परतंत्र आहे

(C) सर्व स्वतंत्र आहेत

(D) सर्व ब्रह्मावर अवलंबून आहेत

24. गांधीजीनुसार सत्य हे यात असावे :

(A) रुढी, परंपरा, नियम

(B) परंपरा, उपासना, कर्म

(C) प्रार्थना, उपासना, समर्पण

(D) विचार, वाचा, कर्म

www.prepp.in



25. *Kevaladvaita-vedanta* accepts the following theory in relation to the origination of the world :

(A) Satkaryavada

(B) Asatkaryavada

(C) Vivartavada

(D) Parinamavada

26. The concept of 'Life-world' (*Lebenswelt*) can be attributed to :

(A) Frege

(B) Meinong

(C) Brentano

(D) Husserl

27. According to Varna-system, study of Vedas was regarded as the duty of :

(A) Only Brahmanas

(B) Brahmanas and Ksatriyas only

(C) Brahmanas, Ksatriyas and Vaisyas only

(D) All the four Varnas

25. विश्वोत्पत्तीच्या संदर्भात केवल अद्वैतवेदांत खालील उपपत्ती स्वीकारतो :

(A) सत्कार्यवाद

(B) असत्कार्यवाद

(C) विवर्तवाद

(D) परिणामवाद

26. 'जीवनविश्व' या संकल्पनेचे जनक हे आहेत :

(A) फ्रेगे

(B) मीनाँग

(C) ब्रेंटानो

(D) हुसेर्ल

27. वर्णव्यवस्थेनुसार वेदांचे अध्ययन हे यांचे कर्तव्य मानले गेले होते :

(A) फक्त ब्राह्मणांचे

(B) फक्त ब्राह्मण व क्षत्रियांचे

(C) फक्त ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्यांचे

(D) चारही वर्णांचे

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



28. In valid categorical syllogism the middle term must be distrbuted :

(A) at least once in the premises

(B) at least twice in the premises

(C) at least once in the conclusion

(D) at least twice in the conclusion

29. According to Buddhism, tri-ratnas mean :

(A) *Sila, Samadhi and Prajña*

(B) *Satya, Ahimsa and Brahmacarya*

(C) *Avidya, Samskara and Vijñana*

(D) *Drsti, Sankalpa and Vak*

30. If 'A' proposition is true, the truth-value of 'O' proposition is................ .

(A) True

(B) False

(C) May be True

(D) May be False

28. युक्त निरुपाधिक संविधानात मध्यपद............ व्याप्त असलेच पाहिजे.

(A) आधार विधानांत कमीतकमी एकदा

(B) आधार विधानांत कमीतकमी दोनदा

(C) निष्कर्षात कमीतकमी एकदा

(D) निष्कर्षात कमीतकमी दोनदा

29. बौद्धमतानुसार त्रिरत्न म्हणजे :

(A) शील, समाधी आणि प्रज्ञा

(B) सत्य, अहिंसा आणि ब्रह्मचर्य

(C) अविद्या, संस्कार आणि विज्ञान

(D) दृष्टी, संकल्प आणि वाक्

30. जर 'A' विधान सत्य असेल तर 'O' विधानाचे सत्यता मूल्य...................

(A) सत्य असेल

(B) असत्य असेल

(C) सत्य असू शकेल

(D) असत्य असू शकेल

www.prepp.in



31. The following purusartha has basically an instrumental value :

(A) Artha

(B) Kama

(C) Dharma

(D) Moksa

32. According to Gandhi, the government of the village should be conducted by :

(A) Panchayat of five persons

(B) Sarpanch

(C) Sarpanch and Teacher of Primary School

(D) Sarpanch and District Collector

33. 'A cannot be both B and not B' is the law of :

(A) Double negation

(B) Identity

(C) Excluded Middle

(D) Contradiction

31. खालील पुरुषार्थाला मूलतः साधनमूल्य असते :

(A) अर्थ

(B) काम

(C) धर्म

(D) मोक्ष

32. गांधीजींच्या मते खेड्यातील शासन यांच्याकडून चालवले पाहिजे :

(A) पाच व्यक्तींची पंचायत

(B) सरपंच

(C) सरपंच आणि प्राथमिक शाळेचा शिक्षक

(D) सरपंच आणि जिल्हाधिकारी

33. "अ हा ब आणि न-ब दोन्ही असू शकत नाही" हा नियम आहे :

(A) द्विवार निषेध

(B) तादात्म्याचा

(C) वर्जित मध्यतेचा

(D) व्याघाताचा

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



34. For Merleau Ponty embodiment is :
    (A) External Space
    (B) Expressive Space
    (C) Mechanical Space
    (D) Natural Space

35. "Everything that happens (begins to be) presupposes something from whch it follows according to some rule." Kant stated this in relation to :
    (A) Causation
    (B) Substance
    (C) Modality
    (D) Relation

36. Prama is understood in Nyaya as :
    (A) Veridical perception
    (B) True cognition—presentative or representative
    (C) True presentative cognition
    (D) Means to knowledge

34. मेर्लो पोन्तीकरिता सदेहता म्हणजे :
    (A) बाह्य अवकाश
    (B) अभिव्यंजक अवकाश
    (C) यांत्रिक अवकाश
    (D) नैसर्गिक अवकाश

35. ''घडणारी प्रत्येक गोष्ट (अस्तित्वात येणारी) असे काही गृहीत धरते, ज्यापासून ती गोष्ट कोणत्यातरी नियमास अनुसरून निष्पन्न होते.'' कांटने हे विधान पुढील संदर्भात केलेले आहे :
    (A) कार्यकारणभाव
    (B) द्रव्य
    (C) रीती
    (D) संबंधी

36. न्यायदर्शनात 'प्रमा' म्हणजे समजले जाते :
    (A) यथार्थ प्रत्यक्ष
    (B) यथार्थज्ञान-अनुभवरूप किंवा स्मृतिरूप
    (C) यथार्थ अनुभवरूप ज्ञान
    (D) यथार्थ ज्ञानाचे साधन

www.prepp.in



37. Locke did *not* root personal identity in :

(A) Consciousness

(B) Memory

(C) Substantial Permanence

(D) Moral Responsibility

38. The world according to Advaita-vedanta is :

(A) Real

(B) Unreal

(C) Both real and unreal

(D) Neither real nor unreal

39. Purvamimamsa accepts the following theory of validity. Choose from the code given below :

(*i*) Intrinsic validity

(*ii*) Extrinsic validity

(*iii*) Intrinsic invalidity

(*iv*) Extrinsic invalidity

(A) (*i*) and (*iii*)

(B) (*ii*) and (*iv*)

(C) (*i*) and (*iv*)

(D) (*ii*) and (*iii*)

37. लॉकने व्यक्तीच्या तदेवतेचा आधार यात शोधला **नाही** :

(A) जाणीव

(B) स्मृती

(C) द्रव्यात्मक नित्यता

(D) नैतिक जबाबदारी

38. अद्वैतवेदांतानुसार जगत् आहे :

(A) सत्

(B) असत्

(C) सत् आणि असत्

(D) सत् ही नाही, असत् ही नाही

39. पूर्वमीमांसादर्शन प्रामाण्यविषयक खालील सिद्धांत स्वीकारते. खाली दिलेल्या कोष्टकातून निवड करा :

(*i*) स्वत: प्रामाण्य

(*ii*) परत: प्रामाण्य

(*iii*) स्वत: अप्रामाण्य

(*iv*) परत: अप्रामाण्य

(A) (*i*) व (*iii*)

(B) (*ii*) व (*iv*)

(C) (*i*) व (*iv*)

(D) (*ii*) व (*iii*)

www.prepp.in



40. Rule-utilitarians maintain that we must consider carefully the importance of :
    (A) The afterlife
    (B) Practices
    (C) Custom and tradition
    (D) Hopes

41. Niskamakarma implies not having desire for :
    (A) any action
    (B) prohibitted actions
    (C) prescribed actions
    (D) fruits of actions

42. The principle of 'might is right' as justice was espoused by :
    (A) Thracymachus
    (B) Meno
    (C) Euthyphro
    (D) Phaedo

40. नियम-उपयुक्ततावादानुसार आपण याचे महत्त्व काळजीपूर्वक लक्षात घ्यायला पाहिजे :
    (A) पश्चात जीवन
    (B) दैनंदिन व्यवहार
    (C) चालीरिती आणि परंपरा
    (D) आशा

41. 'निष्कामकर्म' या कल्पनेतून निष्पन्न होते इच्छा न बाळगणे :
    (A) कोणत्याही कर्माची
    (B) निषिद्ध कर्मांची
    (C) विहित कर्मांची
    (D) कर्मफलांची

42. 'बलिष्ठ तो वरिष्ठ' हे न्यायाचे तत्व यांनी मांडले :
    (A) थ्रॅसिमॅकस
    (B) मीनो
    (C) युथीफ्रो
    (D) फीडो

www.prepp.in



43. According to Naiyayikas, potness in the pot is perceived by eyes through the following type of sense-object-contact :

(A) *Samyoga*

(B) *Samavaya*

(C) *Samyukta-samavaya*

(D) *Samyukta-samaveta-samavaya*

44. A deductive argument is invalid if and only if :

(A) All the premises are false

(B) All the premises are true and the conclusion is false

(C) All the premises and the conclusion are false

(D) All the premises are false but the conclusion is true

45. According to Prescriptivism the basic function of moral language is :

(A) to express speaker's attitude

(B) to describe a scientific fact

(C) to describe non-natural nature of an action

(D) to state what ought to be done

43. न्यायमतानुसार घटामधील घटत्व खालील इंद्रियार्थ संनिकर्षाच्या माध्यमातून डोळ्यांना दिसते :

(A) संयोग

(B) समवाय

(C) संयुक्त समवाय

(D) संयुक्त समवेत समवाय

44. नैगमनिक युक्तिवाद फक्त तेव्हाच अयुक्त असतो जेव्हा :

(A) सर्व आधारविधाने असत्य असतात

(B) सर्व आधारविधाने सत्य असतात आणि निष्कर्ष विधान असत्य असते

(C) सर्व आधार विधाने आणि निष्कर्ष विधानही असत्य असते

(D) सर्व आधार विधाने असत्य असतात पण निष्कर्ष विधान सत्य असते

45. आदेशवादानुसार नैतिक भाषेचे मूलभूत कार्य आहे :

(A) वक्त्याच्या अभिवृत्ती अभिव्यक्त करणे

(B) वैज्ञानिक वस्तुस्थितीचे वर्णन करणे

(C) कृतीच्या न-नैसर्गीक स्वरूपाचे वर्णन करणे

(D) काय करायला पाहिजे हे सांगणे

www.prepp.in



46. The view that the condition of the truth of a belief does *not* involve belief but its objects was upheld by :

(A) Russell

(B) Dewey

(C) Bradley

(D) Austin

47. According to Gandhi, a pre-condition of Satyagraha is :

(A) a belief in rebirth

(B) a belief in moksha

(C) a belief in pleasure as an ultimate end

(D) shanshodhak vritti

46. एखाद्या विश्वासाच्या सत्यतेच्या अटीमध्ये विश्वास अंतर्भूत नसून, त्या विश्वासाचे विषय अंतर्भूत असतात. या दृष्टिकोनाचा पुरस्कार केला :

(A) रसेलने

(B) ड्युईने

(C) ब्रॅडलेने

(D) ऑस्टिनने

47. गांधीजी यांच्यानुसार ही सत्याग्रहाची पूर्वअट आहे :

(A) पुनर्जन्मात विश्वास

(B) मोक्षात विश्वास

(C) अंतिम साध्य म्हणून आनंदात विश्वास

(D) संशोधक वृत्ती

www.prepp.in



48. Akanksa as a constitutive condition of a meaningful sentence means :
    (A) Desire of the speaker
    (B) Intended meaning of the sentence
    (C) Expectancy of a word for other words in a sentence
    (D) Internal consistency of the sentence meaning

49. Ricoeur's relation to Gadamer and Habermas can be described as :
    (A) Critical
    (B) Dialectical
    (C) Analytical
    (D) Reconciliatory

50. A sentence is neither true nor false, but particular use of it is true *or* false according to :
    (A) Russell
    (B) Strawson
    (C) Wittgenstein
    (D) Austin

48. अर्थपूर्ण वाक्याची स्वरूपाधायक असलेली आकांक्षा म्हणजे :
    (A) वक्त्याची इच्छा
    (B) वाक्याचा अभिप्रेत अर्थ
    (C) एका शब्दाची अन्य शब्दांसंबंधीची अपेक्षा
    (D) वाक्यार्थातील आंतरिक सुसंगती

49. रिकरचे गॅडामर व हेबरमास यांच्याशी असलेले नाते पुढीलप्रमाणे वर्णिता येते :
    (A) चिकित्सक
    (B) द्वंद्वात्मक
    (C) विश्लेषणात्मक
    (D) दिलजमाई करणारे

50. वाक्य सत्य **किंवा** असत्य नसते, परंतु त्याचा विशिष्ट उपयोग सत्य किंवा असत्य असतो, हे मत यांचे आहे :
    (A) रसेल
    (B) स्ट्रॉसन
    (C) विट्गेन्स्टाईन
    (D) ऑस्टिन

www.prepp.in



51. The word 'Islam' means :
(A) Grace
(B) Peace
(C) Virtue
(D) Contract

52. State the rule applied in the following argument
(X) (Hx ⊃ Mx)
∴ Hy ⊃ My
(A) The rule of Universal Generalization
(B) The rule of Universal Instantiation
(C) The rule of Existential Generalization
(D) The rule of Existential Instantiation

53. The Ethics of Zoroastrianism is included in the following :
(A) Prayers, charity and meditation
(B) Goodness of thought, speech and action
(C) Worship of light
(D) Tolerance and altruism

51. 'इस्लाम' शब्दाचा अर्थ हा आहे :
(A) कृपा
(B) शान्ती
(C) सद्‌गुण
(D) करार

52. पुढील युक्तिवादात कोणता नियम वापरला आहे ?
(X) (Hx ⊃ Mx)
∴ Hy ⊃ My
(A) सार्विक सामान्यीकरणाचा नियम
(B) सार्विक उदाहरणीकरणाचा नियम
(C) अस्तित्वाची सामान्यीकरणाचा नियम
(D) अस्तित्वाची उदाहरणीकरणाचा नियम

53. झोरॅस्ट्रिॲनिझमचे नीतिशास्त्र यांमधे सामावलेले आहे :
(A) प्रार्थना, दानधर्म व ध्यानधारणा
(B) विचार, वाणी व कर्म यांची शुचिता
(C) प्रकाशाची पूजा
(D) सहिष्णुता व परहितवाद

www.prepp.in



54. Gilligan's feminist ethics of care assumes that human beings are :

(A) Atomic

(B) Intellectual

(C) Relational

(D) Rational

55. According to Christianity, the following are the manifestations of God :

(A) Holy Bible, Holy Church, Holy Son

(B) Holy Son, Holy Father, Holy Mother

(C) Holy Father, Holy Son, Holy Ghost

(D) Holy Mother, Holy Son, Holy Spirit

56. The earliest sacred texts of Hinduism are the :

(A) *Vedas*

(B) *Upanisadas*

(C) *Brahmanas*

(D) *Aranyakas*

54. गिलीगनच्या जपणूकीच्या स्त्रीवादी नीतिशास्त्रामध्ये मनुष्याला असे असल्याचे गृहित धरण्यात येते :

(A) आण्विक

(B) बौद्धिक

(C) संबंधात्मक

(D) विवेकनिष्ठ

55. ख्रिश्चन धर्मानुसार ही ईश्वराचा आविष्कार आहेत :

(A) पवित्र बायबल, पवित्र चर्च, पवित्र पुत्र

(B) पवित्र पुत्र, पवित्र पिता, पवित्र माता

(C) पवित्र पिता, पवित्र पुत्र, पवित्र भूत

(D) पवित्र माता, पवित्र पुत्र, पवित्र आत्मा

56. हिंदू धर्माचे सर्वात आधीचे पवित्र ग्रंथ हे होत :

(A) वेद

(B) उपनिषदे

(C) ब्राह्मणे

(D) आरण्यके

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



57. What, according to Wittgenstein, does a name stand for ?
    (A) Idea
    (B) Universal
    (C) Object
    (D) Picture

58. Searle's classification of speech acts is based on :
    (A) Logic
    (B) Pragmatics
    (C) Syntax
    (D) Semantics

59. "The only freedom which deserves the name, is that of pursuing our own good in our own way, so long as we do not attempt to deprive others of theirs...... ." It is said by :
    (A) Mill
    (B) Hegel
    (C) Kant
    (D) Rousseau

60. Wittgenstein's later view on universals is known as :
    (A) Picture theory
    (B) Linguistic mysticism
    (C) Family resemblance
    (D) Logical atomism

57. विट्गेन्स्टाईनच्या मतानुसार नाम कशाचे वाचक असते ?
    (A) कल्पना
    (B) सामान्ये
    (C) विषय
    (D) चित्र

58. सर्लने केलेले वाक्-क्रियेचे वर्गीकरण यावर आधारित आहे :
    (A) तर्कशास्त्र
    (B) फलवाद
    (C) वाक्यरचनाशास्त्र
    (D) अर्थनिर्धारणशास्त्र

59. ''जोपर्यंत आपण इतरांच्या स्वातंत्र्यास बाधा पोहोचवत नाही, तोपर्यंत आपल्या स्वत:च्या कल्याणाचा आपला मार्ग अवलंबणे, हेच खरे स्वातंत्र्य आहे, ज्यास स्वातंत्र्य हे नाव सार्थ ठरते.'' असे कोणी म्हटले ?
    (A) मिल
    (B) हेगेल
    (C) कांट
    (D) रूसो

60. विट्गेन्स्टाईनचा सामान्यविषयीचा नंतरचा दृष्टिकोन म्हणजे :
    (A) चित्र-उपपत्ती
    (B) भाषिक गुढवाद
    (C) कुटुंब सादृश्यता
    (D) तार्किकीय अणुवाद

www.prepp.in



61. According to the following systems there are only two *pramanas*. Choose from the codes given below :

(*i*) Carvaka

(*ii*) Nyaya

(*iii*) Vaisesika

(*iv*) Sankhya

(*v*) Bhattamimamsa

(*vi*) Buddhism

*Codes* :

(A) (*i*) and (*iv*)

(B) (*ii*) and (*iii*)

(C) (*v*) and (*vi*)

(D) (*iii*) and (*vi*)

62. Which of the following is *not* true for Aristotle ?

(A) Metaphysics is a study of existence

(B) Metaphysics is a study of essense of being

(C) Metaphysics is a study of substance

(D) Metaphysics is a study of an aspect of being

61. खालील दर्शनांनुसार दोनच प्रमाणे आहेत. खाली दिलेल्या कूटकांतून निवड करा :

(*i*) चार्वाक

(*ii*) न्याय

(*iii*) वैशेषिक

(*iv*) सांख्य

(*v*) भट्टमीमांसा

(*vi*) बौद्धदर्शन

**कूट** :

(A) (*i*) व (*iv*)

(B) (*ii*) व (*iii*)

(C) (*v*) व (*vi*)

(D) (*iii*) व (*vi*)

62. ॲरिस्टॉलच्या संदर्भात खालीलपैकी कोणते सत्य **नाही** ?

(A) अस्तित्वाचे अध्ययन म्हणजे अतिभौतिकी

(B) अतिभौतिकी म्हणजे सत्च्या सारतत्त्वाचा अभ्यास

(C) द्रव्यविषयक अध्ययन म्हणजे अतिभौतिकी

(D) अतिभौतिकी म्हणजे सत्च्या पैलूचे अध्ययन

www.prepp.in



63. Ramanuja explains the relation between *Isvara* on the one hand and *Jiva* and *Jagat* on the other, by using the notion of :

(A) *Abheda*

(B) *Bhedabheda*

(C) *Ayutasiddhi*

(D) *Aprthaksiddhi*

64. Akas, dik and kala according to Vaisesika are all :

(A) gunas

(B) perceptible objects

(C) single and vibhu dravyas

(D) creations of God

65. "Nature has placed mankind under the governance of two sovereign masters pain and pleasure." This statement is made by :

(A) Berkeley

(B) Bradley

(C) Bentham

(D) Broad

63. एकीकडे ईश्वर व दुसरीकडे जीव आणि जगत् यांच्यातील संबंधाचे स्पष्टीकरण रामानुज खालील संकल्पनेच्या आधारे करतात :

(A) अभेद

(B) भेदाभेद

(C) अयुतसिद्धि

(D) अपृथक्सिद्धि

64. वैशेषिकांच्या मतानुसार आकाश, दिक् आणि काल ही सर्व :

(A) गुण आहेत

(B) प्रत्यक्षज्ञेय विषय आहेत

(C) एकटी विभु द्रव्ये आहेत

(D) ईश्वराची निर्मिती आहेत

65. ''निसर्गाने मानवाला दु:ख आणि सुख या दोन सार्वभौम सत्तेच्या अधिपत्याखाली ठेवले आहे.'' हे कथन यांनी केले आहे :

(A) बर्क्ले

(B) ब्रॅडले

(C) बेंथम

(D) ब्रॉड

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



66. The following school is known for proposing complex definitions of *vyapti*, examining them crtically and trying to reach the final definition :

(A) Pracina-nyaya

(B) Navyanyaya

(C) Vaisesika

(D) Mahayana-Buddhism

67. Identify the rule of exportation :

(A) $[(p.q) \vee r] \equiv [(p \supset q) \vee r]$

(B) $[(p.q) \vee r] \equiv [(p \vee r) . (q \vee r)]$

(C) $[(p \supset q) . r] \equiv [(p \supset q) . (q \supset r)]$

(D) $[(p.q) \supset r] \equiv [p \supset (q \supset r)]$

68. The view that the inductive principle cannot be proved or disproved was upheld by :

(A) Frege

(B) Russell

(C) Locke

(D) Descartes

66. खालील दर्शन व्याप्तीची गुंतागुंतीची लक्षणे प्रस्तुत करणे, त्यांचे चिकित्सक परीक्षण करणे आणि अंतिम लक्षणाप्रत जाण्याचा प्रयत्न करणे यांसाठी ज्ञात आहे :

(A) प्राचीन न्याय

(B) नव्यन्याय

(C) वैशेषिक

(D) महायान बौद्धदर्शन

67. बहि:सरणाचा नियम ओळखा :

(A) $[(p.q) \vee r] \equiv [(p \supset q) \vee r]$

(B) $[(p.q) \vee r] \equiv [(p \vee r) . (q \vee r)]$

(C) $[(p \supset q) . r] \equiv [(p \supset q) . (q \supset r)]$

(D) $[(p.q) \supset r] \equiv [p \supset (q \supset r)]$

68. विगमनाचे तत्व सिद्धही करता येत नाही किंवा असिद्धही करता येत नाही हे मत यांनी मांडले :

(A) फ्रेग

(B) रसेल

(C) लॉक

(D) देकार्त

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



69. Which of the following is *not* a well formed formula (wff) ?

(A) p∨q

(B) p ⊃ (q ≡ p)

(C) ~ p ∨ q ⊃

(D) (~ p . q) ≡ (~ p ⊃ q)

70. Which of the following statements are true according to Frege ?

(1) Concepts are independent of objects

(2) Concepts are real in a logical realm

(3) Concepts are names

(4) Concepts are mental images

(A) (1) and (2)

(B) (3) and (4)

(C) (1) and (3)

(D) (2) and (4)

71. The book *Conflict of Interpretations*, is written by :

(A) Dilthey

(B) Gadamer

(C) Habermas

(D) Ricoeur

69. पुढीलपैकी कोणते सुघटित सूत्र **नाही** ?

(A) p∨q

(B) p ⊃ (q ≡ p)

(C) ~ p ∨ q ⊃

(D) (~ p . q) ≡ (~ p ⊃ q)

70. फ्रेगेच्या मतानुसार, खालीलपैकी कोणती निवेदने **सत्य** आहेत ?

(1) संकल्पना विषयांवर अवलंबून नसतात

(2) संकल्पना तार्किकीय क्षेत्रात सत् असतात

(3) संकल्पना नाम आहेत

(4) संकल्पना मानसिक प्रतिमा आहेत

(A) (1) आणि (2)

(B) (3) आणि (4)

(C) (1) आणि (3)

(D) (2) आणि (4)

71. कॉन्फ्लिक्ट ऑफ इंटरप्रीटेशन्स हे पुस्तक यांनी लिहिले :

(A) डिलथी

(B) गॅडॅमर

(C) हेबरमास

(D) रिकर

www.prepp.in



72. According to Gandhi, Varna is :
   (A) Class as well as caste
   (B) Class and not caste
   (C) Caste and not class
   (D) Classless caste

73. According to Jainism, Samyaka Caritra consists of these five :
   (A) *Vratas*
   (B) *Silas*
   (C) *Yama*
   (D) *Niyama*

74. Who maintained that :
   "Philosophers have not done justice to the distinction, ....between knowing that something is the case and knowing how to do things."
   (A) Ayer
   (B) Austin
   (C) James
   (D) Ryle

75. According to Vaisesikas an eternal substance must be of :
   (A) minutest size
   (B) larger than minute size
   (C) minutest or largest size
   (D) largest size

72. गांधीजींच्या मते वर्ण म्हणजे :
   (A) वर्ग तसेच जात
   (B) वर्ग पण जात नव्हे
   (C) जात पण वर्ग नव्हे
   (D) वर्गविरहित जात

73. जैन धर्मानुसार सम्यक चरित्रात या पाचांचा अंतर्भाव होतो :
   (A) व्रत
   (B) शील
   (C) यम
   (D) नियम

74. वस्तुस्थिती काय आहे याविषयीचे ज्ञान आणि कौशल्यांचे ज्ञान यातील फरकाला तत्त्वज्ञांनी न्याय दिला नाही असे मत कोणी माडले ?
   (A) एअर
   (B) ऑस्टिन
   (C) जेम्स
   (D) राईल

75. वैशेषिकांच्या मते नित्य द्रव्य या आकाराचे असते :
   (A) सूक्ष्मतम आकार
   (B) सूक्ष्मापेक्षा महत् आकार
   (C) सूक्ष्मतम किंवा महत्तम आकार
   (D) महत्तम आकार

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



ROUGH WORK

Prepp
Your Personal Exam Guide

ROUGH WORK

Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र.

**M**

# Paper-III
# PHILOSOPHY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

   (Name) ..........................................

2. (Signature) ..........................................

   (Name) ..........................................

Seat No. [ ][ ][ ][ ][ ][ ]

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. [ ][ ][ ][ ][ ][ ]

(To be filled by the Candidate)

**FEB - 12313**

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **32** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.

   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी आवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   - (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.

   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**